# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

**CB/05/2026**

# प्रेसनोट

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक २९/०१/२०२६ |
|---|---|

**शेअर्स मार्केट ट्रेडिंग मधुन आर्थिक फायदा मिळवुन देण्याचे अमिष दाखवुन फसवणुक करणा-या 03 आरोपींना सायबर पोलीस ठाणे यांनी केली अटक**

---

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ, गुन्हे शाखा यांनी जास्तीत जास्त सायबर गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

दिनांक 14/08/2025 रोजी ते दिनांक 19/11/2025 रोजीचे कालावधीत फॉरेक्स ट्रेडिंगचे गुंतवणुकीमध्ये जास्तीत जास्त फायदा मिळवुन देण्याचे आमिष दाखवुन आरोपींनी फिर्यादी यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर आरोपींनी वेगवेगळया बॅक खात्यावर गुंतवणुकी करिता रक्कम पाठवण्यास सांगितले. बनावट ॲपद्वारे गुंतवणुक केलेली रक्कम व त्यावर मिळालेला अभासी नफा एकुण रू. 56,27,410/- ची आर्थिक फसवणुक केली म्हणुन सायबर पोलीस ठाणे गु.र.क्र. 58/2025 कलम बी.एन.एस. 319(2), 318(4), 3(5) सह कलम 66 (डी) आय.टी.ॲक्ट अधिनियम अन्वये अनोळखी इसमा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा दाखल झाले नंतर तपास पथक तयार करण्यात आले होते. तपास पथकाने गुन्ह्यातील फसवणुकीची रक्कम वळते झालेले प्रथम लेअर मधील बॅक खाते धारकास निष्पन केले. सदर बॅक खाते धारक आरोपी क्रमांक 01 सलीम अहमद शेख, वय 43 वर्षे, रा. संतोष भवन, नालासोपारा (पु), ठाणे यास दिनांक 20/01/2026 रोजी ताब्यात घेण्यात आले. त्याचेकडे अधिक तपास केला असता त्याने त्याचे बॅक खाते 2,00,000/- रू. मोबदल्यात त्याचा साथीदार मोहम्मद नवील हरून उर्फ मोनु यास दिले असल्याचे सांगितले.

तपासामध्ये प्राप्त मोबाईल क्रमांकाचे विश्लेषण केले असता आरोपी क्रमांक 02 मोहम्मद नवील हरून उर्फ मोनु, वय 35 वर्षे, हा डोंबिवली येथील आयकिया हॉटेल मध्ये असल्याची माहिती प्राप्त झाली. सदर ठिकाणी छापा कारवाई करून त्यास ताब्यात घेण्यात आले. पुढील तपासात त्यास बॅक खाते पुरविण्याकरिता आलेला सहयोग कॉ.ऑप बॅक, शाखा-सायन, मुंबई मधील रिलेशनशिप मॅनेजर आरोपी क्रमांक 03 सद्दाम अली एजाज अहमद, वय 30 वर्षे, हा निष्पन झाल्याने त्यांना दिनांक 26/01/2026 रोजी सदर गुन्हयात

अटक करण्यात आली आहे. **आरोपींचे ताब्यातुन 04 मोबाईल फोन, 06 सिमकार्ड, 02 बॅक खात्यांचे चेकबुक, 02 बॅकेचे डेबिट कार्ड** जप्त करण्यात आले आहे.

तसेच **आरोपी क्रमांक 02 मोहम्मद नवील हरुन उर्फ मोनु याचे घरझडती मध्ये 17 विविध बॅकेचे चेकबुक, 10 डेबिट कार्ड, 03 पासबुक, 03 मोबाईल फोन, 08 सिमकार्ड, 03 आधारकार्ड तसेच 18 सिमकार्डचे मोकळे पॅकेट जप्त** करण्यात आले आहे.

आरोपी क्रमांक 02 मोहम्मद नवील हरुन उर्फ मोनु याचेकडे अधिक तपास केला असता आरोपी हा मुंबई, ठाणे, डोंबिवली परिसरातील विविध हॉटेल/लॉज मध्ये रुम भाडयाने घेवुन त्याठिकाणी प्राप्त केलेले विविध बॅक खातेशी संलग्न मोबाईल क्रमांक व ईमेल स्वतःकडील मोबाईल फोन मध्ये लॉगिन करुन बॅक खाते मधील ट्रान्झक्शचा ओ.टी.पी. प्राप्त झाले नंतर सदर ओ.टी.पी. त्याचे अन्य साथीदारांना पाठविण्याचे काम करीत होता. तसेच आरोपी क्रमांक 03 सद्दाम अली एजाज अहमद हा आरोपी क्रमांक 02 यास बॅक खाते पुरविण्याचे काम करित होता. आरोपीचा देशातील 08 राज्यामधील सायबर तक्रारी मध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. अटक आरोपींची दि.31/01/2026 रोजी पावेतो पोलीस कस्टडी मंजुर आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी सहाय्यक पोलीस आयुक्त, आ.गु.शा./सायबर, श्रीमती प्रेरणा कट्टे यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणेचे वपोनि विशाल पाटील, पोनि गणेश जाधव, सपोनि अजित कानगुडे, पो.ह./संदेश गुजर, पो.ह./अल्पेश पाटील, पो.शि./अमोल कर्डिल, पो.शि./सचिन पावशे व सायबर तज्ञ गौरव कारखेले यांनी केलेली आहे.

----------------00000-----------------